नियमित फौ.ख.क्र. ३११/२०२२
सरकार वि. रबानी
नि.क्र.        खाली

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०१ शपथेवरः-</u>**

माझे नाव - अकबर बाशा पटेल,
वय ४१ वर्षे, कामधंदा - मजुरी,
रा. लामजना, ता. औसा, जि. लातूर.

**<u>सरतपास विद्वान सरकारी अभियोक्ता श्री एस. एस. वाघमारे मार्फत शपथेवर सुरु :-</u>**

मी आरोपींना ओळखतो. आरोपी माझे चुलतभाउ आहेत. त्यांना तुम्ही गावामध्ये गुंडगिरी करू नका असे मी सांगितले होते. त्यांची खुन्नस धरून दि. १०.०२.२०२२ रोजी रात्री ९.३० च्या दरम्यान एम.एस.सी.बी.च्या कार्यालया समोर रोडच्या पलीकडे आरोपी आले आणि मला म्हणाले की, तु मला कोण सांगणार असे म्हणुन आरोपी आजम पटेलने इबाज पटेलला सळईने डोक्यात, हातावर मारहाण केली. रबानी पटेल याने जाकीर बाशा पटेल याला सळईने आणि लाथा बुक्यानी मारहाण केली. यासीन रहीम शेख याने कापडामध्ये गुंडाळलेले वस्तुने डोक्यावर आणि हातापायावर वार केले. इबाज पटेल हा माझा लहान भाउ आहे. जाकीर बाशा पटेल हा माझा दोन नंबरचा भाउ आहे. सदर मारहाणीच्यावेळी आरोपीसोबत अजुन तीन अनोळखी लोक होते. सदर मारहाणीनंतर आम्ही घटनास्थळी पडलेलो होतो तेथुन आरोपी निघुन गेले. सदर भांडणाची सोडवा-सोडव मजहर बिरादार, अजमल पटेल आणि अजीम मुल्ला यांनी केली. घटनास्थळावरून आम्ही किल्लारी येथील शासकीय दवाखान्यात गेलो. त्या ठिकाणी प्राथमिक उपचार घेतल्यानंतर पुढील उपचाराकरीता लातुर येथील शासकीय रूग्णालयात पाठवले. त्यानंतर आम्ही लातुर येथील शासकीय रूग्णालयात दाखल झालो, दुस-या दिवशी मला आणि जाकीर पटेल याला घरी सोडले परंतु इबाज पटेल यांच्यावर दोन दिवस उपचार

चालु होते. दवाखान्यातुन सकाळी ७.०० वाजता सोडल्यानंतर १०.३० वाजता आम्ही किल्लारी पोलीस स्टेशनला गेलो. आमच्या सांगण्याप्रमाणे पोलीसांनी आमची फिर्याद नोंदवुन घेतली. आमच्या फिर्यादीनुसार आरोपींवर कारवाई करण्यात आली. सदरची फिर्याद मला दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादला **नि.क्र. पी–१/पी.डब्ल्यु–१** देण्यात येते.

२. सदरच्या फिर्याद दाखल केल्यानंतर पोलीस घटनास्थळी आलेले होते. त्यांनी आमच्याकडे घटनेची चौकशी केली. अनौळखी व्यक्तीबाबत पोलीसांनी आमच्याकडे चौकशी केली होती. ज्या आरोपींनी मला मारहाण केली ते आरोपी आज रोजी कोर्टात हजर आहेत. आरोपींनी ज्या सळयांनी मला माझया भावाला मारहाण केली, त्या सळया मला दाखवण्यात आल्या. त्या सळयांनी आम्हाला मारहाण करण्यात आलेली होती. सदर सळयास **एम.ओ.–१ व एम. ओ.–२** असे संबोधण्यात येते.

३. माझा कोर्टामध्ये जबाब नोंदवण्यात आलेला होता. सदरचा बंद लिफाफा खुल्या न्यायालयात आरोपी क्र. १ ते ३, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या समक्ष उघण्यात आला. सदरचा जबाब हा तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. पी–२/पी. डब्ल्यु–१** देण्यात येते.

४. मी पोलीसांना दिलेल्या तक्रारीच्या आधारे प्रथम खबरी अहवाल नोंदवण्यात आला. आता मला सदरचा अहवाल दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र.–३ देण्यात आलेली आहे. सदरची निशाणी कायम करण्यात येते.

**सरतपास संपला.**

**आरोपी क्र.०१ ते ०३ यांनी साक्षीदाराचा उलट तपास घेण्याचे नाकारले.**

**आरोपीचा कामकाज तहकुबीचा अर्ज नामंजुर करण्यात आल्यामुळे आरोपीविरूध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

**उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.06.19 16:14:52 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. १९.०६.२०२६

माझे समक्ष,

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.06.19 16:14:47 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. १९.०६.२०२६